**वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीच्या मंजूरीचे वित्तीय अधिकार प्रदान करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वैखप्र-२०१९/प्र.क्र.८३/२०१९/आ(क्षेप्र)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
तारीख: ६ सप्टेंबर, २०१९.

वाचा :-

१) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः वैखप्र-२०१६/प्र.क्र.१६/२०१६/ राकावि-२, दिनांक १६ मार्च २०१६.**

२) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः वैखप्र-२०१८/ प्र.क्र.४८८/२०१८/राकावि-२, दिनांक ०६ जून २०१९.**

प्रस्तावना :-

शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील तरतूदींच्या अधीन राहून, आकस्मिकरीत्या उद्भवणा-या २७ आजारांवर खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारांवरील तसेच ५ गंभीर आजारांवर, शासनाने संपूर्ण खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील वैद्यकीय खर्चाच्या प्रत्येक प्रकरणी रु.३,००,०००/- (रुपये तीन लक्ष फक्त) च्या कमाल मर्यादेत, प्रतिपूर्तीस मंजूरी देण्याचे अधिकार उपरोक्त वाचा येथील अ.क्र.१ येथील सा.आ.वि. शासन निर्णय दिनांक १६ मार्च, २०१६ नुसार विभाग प्रमुखांना प्रदान केलेले आहेत. या मर्यादेवरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे अधिकार प्रशासकीय विभाग प्रमुखांना असल्याने संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडे प्रस्ताव सादर केले जातात. वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीच्या प्रस्तावांची प्रलंबित प्रकरणे लक्षात घेता, महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधीन राहून रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष फक्त) पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसंदर्भात विभागप्रमुखांना असलेल्या वित्तीय अधिकारात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या उपरोक्त वाचा येथील शासन निर्णय दिनांक ०६ जून, २०१९ नुसार बदल करण्यात आले आहेत. या शासन निर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये नमूद केल्यानुसार जलसंपदा विभागाच्या सध्याच्या आकृतिबंधातील मंजूर पदनाम विचारात घेवून, निव्वळ वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजूरीकरीता विभागाच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख घोषित करण्याची बाब या विभागाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०६ जून, २०१९ च्या परिच्छेद ६ मध्ये नमूद केल्यानुसार जलसंपदा विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अधिकारी/कर्मचा-यांच्या निव्वळ वैद्यकीय

खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजूरीकरीता विभागप्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख खालीलप्रमाणे घोषित करण्यास व त्यांच्यासमोर विहित केलेल्या वित्तीय मर्यादेत प्रतिपूर्तीचे अधिकार प्रदान करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | सक्षम प्राधिकारी | सक्षम प्राधिका-याचे पदनाम | शा.नि.सा.आ.वि. दि.६/६/२०१९ नुसार अधिकार |
|---|---|---|---|
| १. | मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुख | प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई | रु.३,००,०००/-(अक्षरी रुपये तीन लक्ष) वरील प्रकरणे |
| २. | विभाग प्रमुख | १) महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा, नाशिक (DTHRS) | रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) वरील परंतु रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) पर्यंतची प्रकरणे |
| | | २) सर्व कार्यकारी संचालक | |
| | | ३) सर्व मुख्य अभियंता / मुख्य अभियंता तथा मुख्य प्रशासक | |
| | | ४) मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत, मुंबई | |
| | | ५) मुख्य अभियंता (यांत्रिकी), नाशिक | |
| | | ६) मुख्य अभियंता (स्थापत्य), जलविद्युत प्रकल्प, गुणनियंत्रण, पुणे. | |
| ३. | प्रादेशिक विभाग प्रमुख | सर्व अधीक्षक अभियंता/ अधीक्षक अभियंता व सहसंचालक | रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) पर्यंतची प्रकरणे |
| ४. | विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख | शासनाच्या थेट नियंत्रणाखालील कार्यालये | रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) पर्यंतची सर्व प्रकरणे |
| | | १) मुख्य अभियंता तथा मुख्य लेखापरीक्षक, औरंगाबाद | |
| | | २) अधीक्षक अभियंता, पाटबंधारे संशोधन विकास संस्था, पुणे. | |
| | | ३) अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, पुणे/ठाणे/औरंगाबाद/नागपूर/अमरावती | |
| | | ४) अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद कक्ष, पुणे | |
| | | ५) अधीक्षक अभियंता तथा सचिव, आंतरराज्य नियंत्रण मंडळ, नागपूर. | |

२. जलसंपदा विभागाच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालयांमधील अधिकारी/कर्मचा-यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरी देतांना सार्वजनिक आरोग्य विभागाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या

अटी व शर्ती पूर्तता होत असल्याची खातरजमा करावी तसेच दिनांक ०६ जून, २०१९ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९०६१६०८५८३२२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Uddhav Rabhaji Dahiphale

Digitally signed by Uddhav Rabhaji Dahiphale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=05b3ca49b9a0a924fd4d8743e6e254e742308f02108527986e098afc27201f30, serialNumber=2d80774c9ed65eca9be69006934bfb5c4ca32ab0dc1a2ec5746398458bdf1c37, cn=Uddhav Rabhaji Dahiphale
Date: 2019.09.06 16:14:20 +05'30'

**उद्धव रभाजी दहिफळे**
उप सचिव,महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री, जलसंपदा विभाग, यांचे खाजगी सचिव
४. मा.मंत्री (खारभूमी) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री, जलसंपदा विभाग, यांचे खाजगी सचिव
६. मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद/ विधानसभा
७. मा.विधानपरिषद/ विधानसभा सदस्य (सर्व)
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (जसंवि)/सचिव (लाक्षेवि)/सचिव (प्रकल्प व समन्वय) यांचे स्वीय सहाय्यक
१०. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान संशोधन सुरक्षा, नाशिक
१२. सर्व कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ/विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद/कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे/ तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव
१३. जसंवि च्या अधिपत्याखालील सर्व मुख्य अभियंते/ मुख्य अभियंता तथा मुख्य प्रशासक/ मुख्य अभियंता व मुख्य लेखापरीक्षक जल व सिंचन, म.रा. औरंगाबाद
१४. जसंवि च्या अधिपत्याखालील सर्व परिमंडळीय अधीक्षक अभियंते, त्यांना विनंती की, कृपया हा शासन निर्णय आपल्या अधिपत्याखालील सर्व अधीक्षक अभियंता/सर्व कार्यकारी अभियंता यांना पाठवून त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

१५. अधीक्षक अभियंता व सह संचालक, महा.अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक (मेरी)/अधीक्षक अभियंता व प्राचार्य महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षक संस्था, नाशिक (मेटा)/ अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक (SLTC)/ अधीक्षक अभियंता, पाटबंधारे संशोधन विकास संस्था, पुणे/अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद कक्ष, पुणे/अधीक्षक अभियंता व सचिव, आंतरराज्य नियंत्रण मंडळ, नागपूर/अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, पुणे/ठाणे/नागपूर/औरंगाबाद/अमरावती.

१६. सर्व सह सचिव/उप सचिव/कार्यासन अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

१७. आ(क्षेप्र) संग्रहार्थ.